**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०४**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०१/०८/२०१९ वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०१/०८/२०१९ रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांची नावे | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ३ | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ४ | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ५ | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ६ | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ७ | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| ८ | मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | स्विकृत सदस्य |
| ९ | मा.लांडगे कुणाल दशरथ | नामनिर्देशित सदस्य |
| १० | मा. कणसे संजय गुलाब | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.प्रविण अष्टीकर क्षेत्रीय अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, श्री. प्रदीप पुजारी- कार्यकारी अभियंता जलनि:सारण विभाग, डॉ.यशवंत इंगळे- दंतशल्यचिकीत्सक वायसीएमएच, श्री.संजय खावडे – कार्यकारी अभियंता (वि), श्री.पवार एस.एस.कार्य.अभियंता- पाणीपुरवठा, श्री.संजय चंद्रकांत काशिद –उपअभियंता- बीआरटीएस, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्रीम.मोमीन झेड.आय.- उपअभियंता, श्री.मोहन खोंद्रे – उपअभियंता-झो.नि. पू., श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता, श्री.धनंजय गवळी- उपअभियंता- स्थापत्य, श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता, (वि), श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था.), श्रीम.एस.एस.कुलकर्णी , क.अभियंता, श्रीम.ए.ए.मोरे – क.अभियंता(स्था.उ.), श्री.आर.आर.माडे – का.अ(अतिक्रमण), श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अ.जलनि:सारण, श्री. समीर दळवी – क.अभियंता –विद्युत, श्री.कांबळे व्ही.स.क.अभियंता स्थापत्य, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, श्रीम.प्रीती यादव – क.अभियंता- जलनि:सारण, श्री.पाटील आर.एच.-क.अभियंता, श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.सानप एस.एस.-क.अभियंता, श्री.एस.ए.बगली- क.अभियंता, , श्री.डी.एस.सासवडकर- सहा.आरोग्याधिकारी, श्री. एस.बी.लांडगे – उद्यान सहाय्यक, श्री.जे.व्ही.पटेल-सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.जी.शिरसाट – उद्यान सहाय्यक (उद्यान) श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.संजय बबनराव मानमोडे – आरोग्य निरीक्षक, श्री.कोटियाना डी.एम. – आरोग्य निरीक्षक ,श्रीम.रश्मी तुंडलवार – आ.नि., श्री.एस.एच.चौहान – आरोग्य निरीक्षक आरोग्य, श्री.राजेंद्र वाघमारे- आ.नि. आरोग्य, उध्दव डवरी –आ.नि. कचरावाहतुक, , सौ.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक,

------------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे जयंतीच्या शुभेच्छा देऊन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**मा.कणसे संजय गुलाब – नामनिर्देशित सदस्य** – मा.राऊत मॅडम यांनी खूप सहकार्य केले. व त्यांनी चांगले मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानतो. तसेच नवीन क्षेत्रीय अधिकारी मा.प्रविण अष्टीकर यांनी पदभार स्विकारला आहे. तेही चांगल्या प्रकारे काम करतील. पी.सी.एम.सीचे ह प्रभागाचा उच्चस्तर वाढवतील अशी अपेक्षा करतो. पुढील कामकाज मा.सभापती यांचे मान्यतेने सुरु करावे.

**क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** : माहे ऑगस्ट २०१९ च्या दिनांक ०१/०८/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव**, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.०४ माहे ऑगस्ट २०१९ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे ऑगस्ट २०१९ कार्यपत्रिका क्र. ०४ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव** - सभाशाखा :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : सन्मा. सदस्ययांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.
**विषय क्र.१-** प्रभार क्र. ३१ काटेपुरम चौक येथील अडथळा काढणेबाबत.मा.सभापती यांचकडील पत्र.

सुचक – मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे व अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

**विषय क्र.२** – प्रभाग क्र. ३२ सांगवी भागातील अस्वच्छता असणा-या परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत मा.सभापती यांचकडील दिनांक १/०८/२०१९ चा प्रस्ताव.

सुचक – मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे व अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

तदनंतर माहे सप्टेंबर २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

--------

**मा.ज्ञानेश्वर थोरात-स्विकृत सदस्य** – पावसाळयामुळे सगळीकडे खड्डे पडले आहेत. नाशिक फाटा येथे ८,१० मोठे खड्डे पडले आहे. दुचाकी गाडीचे चाक खड्डयात अडकते. कासारवाडीचा चौक ते नाशिक फाटा रस्त्यात खूप खड्डे पडले आहे.

**श्री.गवळी डी.डी.- उप अभियंता, स्थापत्य** – सदरचा रस्ता बीआरटीएसचा रस्ता आहे. पावसामुळे पुन्हा पुन्हा खड्डे पडत आहेत. सदरचे खड्डे वारंवार बुजविण्यात येत आहे.

**मा.कणसे संजय गुलाब – नामनिर्देशित सदस्य** – दापोडीमध्ये ड्रेनेजचा खूप मोठा प्रश्न उद्भवला आहे. जवळपासच्या सोसायटीमध्ये पाणी शिरले आहे. रस्त्याचे डांबरीकरण करणे. ड्रेनेजचा प्रश्न लवकर सोडवणे.

**मा.ज्ञानेश्वर थोरात- स्विकृत सदस्य** – मा.महापौरसाहेब प्रभागामध्ये मिटींगला आले होते. त्यावेळी स्वच्छतेच्या बाबतीत खूप चर्चा करण्यात आली होती. कच-याचा खूप मोठा प्रश्न आहे. कच-याच्या गाडया उंच केल्या आहेत त्यामुळे महिलांना कचरा टाकता येत नाही. अशा ब-याच विषयावर आरोग्य विभागाशी संबंधीत चर्चा झाली परंतू आरोग्य विभागाचे प्रमुख मिटींगला हजर नव्हते. त्यानंतर आजचे मिटींगलासुध्दा ते उपस्थित नाहीत. तरी डॉ.अनिल रॉय (आरोग्य वैद्यकिय अधिकारी) यांना मिटींगला बोलविण्यात यावे असे महापौर साहेबांनी आदेश दिले होते.

**मा.सभापती** – मा.महापौर साहेबांच्या मिटींगला सुध्दा आले नाही. स्वच्छतेबाबत पेपरला आले आहे. मा.महापौर साहेबांनी आदेश देऊनही कार्यवाही होत नाही.

**मा.प्रविण अष्टीकर – सहा.आयुक्त** – डॉ.रॉयसर यांचेशी मी स्वता: बोलतो. व त्यांना पत्र देतो. सक्षम अधिकारी मिटींगला आले पाहिजे. संबंधीत विभागप्रमुख आले पाहिजे परंतू ते आले नाही तर मा.आयुक्त साहेब कार्यवाही करतील.

**मा.माऊली थोरात - स्वीकृत सदस्य** – शहराचे प्रथम नागरीक मा.महापौर साहेब यांनी मिटींगला येणेबाबत आदेश देऊनही कार्यवाही होत नाही.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे** – कच-याच्या गाडया ताबडतोब जमा करा. कच-याच्या गाडया खूप उंच असल्यामुळे महिलांना कचरा गाडीमध्ये टाकता येत नाही . गाडी उंच असल्यामुळे कचरा गाडीत टाकताना डोक्यावर पडतो.

**मा.सभापती** – ह प्रभागासाठी कॉन्ट्रॅक्टर नको आणि सध्या काम करीत असलेले अधिकारी नको. तीन वर्षापासून आम्ही नगरसेवक आमचे प्रश्न मांडतात.. इथे उपस्थित होणारे सर्व प्रश्नांना उत्तर दयावे.

**मा.माऊली थोरात स्वीकृत सदस्य** – ड्रेनेजचा प्रॉब्लेम सगळीकडे आहे. तरी सुध्दा ड्रेनेज विभागाचे अधिकारी मिटींगला उपस्थित नाही. अधिकारी मिटींगला का येत नाही. सगळीकडील ड्रेनेजचे चेंबर्स दोन्ही साईडनी प्लास्टर होत नाही. वारंवार ड्रेनेजची तक्रार करुन त्याबाबत काही कार्यवाही होत नाही. राऊत मॅडमची सहकार्याची भावना होती. ड्रेनेजचे अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. अनेकवेळा सांगितले आहे. मा.महापौरानी सांगि तलेप्रमाणे कार्यवाही करावी. तिसरी मिटींग आहे कार्यवाही का होत नाही.

**मा.सभापती** – दापोडीची परिस्थिती प्रत्यक्ष बघा आणि ठरवा. सर्व अधिका-यांनी कामे वेळेवर केली पाहिजे. ड्रेनेजचा खूप महत्वाचा प्रश्न आहे. अजिबात निर्णय घेत नाही.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे** – पावसाळयापुर्वी सर्व कामे केली पाहिजे. ड्रेनेज लिकेजमुळे एका व्यक्तीचा दीड लाखाचा कडबा ओला झाला. त्यामुळे ड्रेनेजची आमची खूप तक्रार आहे. ड्रेनेजचे दोन, तीन पाईप जुने झालेले आहे. शिवाजी पुतळयाजवळ झोपडपट्टी आहे ती उठविणे. ड्रेनेजमुळे बोपोडीरोडचे चेंबर्स चोकअप झाले आहेत. ओपन गटारे साफ केली पाहिजे. गोल चेंबर्स, चौकोनी चेंबर्स हे माहिती करुन घेणे. व दोन्हीही चेंबर्स साफ करणे. चौकोनी चेंबर्स साफ करणारे कर्मचारी दिसत नाही.

**मा.संजय कणसे नामनिर्देशित सदस्य** – तीन महिन्यापासून हा विषय चालू आहे. परंतू त्याबाबत काहीही कामे होत नाही.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत** – दापोडीमधील लोकांच्या घरात पाणी शिरले आहे. लोकांना शाळेत हलविण्यात यावे. तेथील लोकांकडे लक्ष दयावे.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे** – पावसामुळे लोकांच्या घरात पाणी शिरले आहे. पीडब्लयू येथील लोकांना बाहेर काढले का. कर्मचारी काम करीत नसेल तर त्यांची वेतनवाढ कमी करा. लवकरात लवकर लोकांनी झोपडया टाकलेल्या आहेत त्या काढून टाका. ती जागा पाटबंधारे खात्याची आहे. झोपडया टाकून खूप दिवस झाले आहेत. त्या झोपडया हुसकावून लावा. स्मार्ट सिटीमध्ये शहर जाण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. स्वच्छता अभियान राबविण्यात येते. आणि हे कसे काय आहे. त्या झोपडया काढल्या नाही तर उपोषण करणेत येईल. उघडयावर घाण करतात. रस्त्यावर सुध्दा खूप घाण करतात. रस्ता क्रॉस करुन हंडा भरुन पाणी भरतात. आपले शहराला विद्रुप करीत असतील तर महत्वाचे निर्णय घ्यावे. अतिक्रमण विभागाने काम केले पाहिजे. आरोग्य विभागाला दोष का देता?

**श्री.माडे कार्या.अधिक्षक अतिक्रमण** – इंगळे साहेबांशी बोलणे झाले आहे. अतिक्रमणचे काम केले जाईल.

**मा.प्रविण अष्टीकर सहा.आयुक्त** - अतिक्रमण हटविणे हे अतिक्रमण विभागाचे काम आहे.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत** – झोपडपट्टी लवकरात लवकर हटविण्यात यावी.

**मा.माधवी राजापुरे** - आमचे प्रभागात पाण्याचा प्रेशर नाही. सगळीकडे कमी दाबाने पाणी येते.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे** – २४x ७ चे काम चालू आहे.नवीन पाईप लाईन जोडणार आहे. ते काम किती दिवसात करणार आहे. प्रत्येकाचे दारात खड्डे पडले आहे. त्यामुळे घराला घुशी लागलेल्या आहेत.

**मा.सभापती** - पाणीपुरवठा विभागाचे २४x ७ चे काम करणारे अधिकारी/कर्मचारी आले का ?

**मा.माधवी राजापुरे** – गेले जून महिन्यापासून पाण्याची तक्रार करीत आहे. समान पाणी देणे गरजेचे आहे.

**मा.पवार –कार्य.अभियंता – पाणीपुरवठा** - २४x ७ चे काम करण्यासाठी पाईप टाकणेचे काम करुन घेतले आहे. तसेच तज्ञ व्यक्तीला आणले होते.

**मा.सीमा चौगुले** – पाण्यासाठी खूप नागरीक ओरडतात. सगळीकडे सारखे प्रमाणात पाणी दयावे. कमी जास्त प्रमाणात पाणी येत आहे.

**मा.माधवी राजापुरे** – किर्तीनगर या ठिकाणी रस्त्यावर खूप खड्डे पडले आहे.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत** – पाणी सोडणारा कर्मचारी शंकर पवार या ठिकाणी नको. त्याचे ऐवजी दुस-या कर्मचा-याची नेमणूक करा.

**मा.सभापती** – दापोडीमध्ये ड्रेनेजचा खूप प्रॉब्लेम आहे. अधिका-यांनी लक्ष दिले पाहिजे. ड्रेनेजचे काम प्राधान्याने केले पाहिजे. सध्या दापोडीची परिस्थिती अवघड आहे.नाशिक फाटयाचा विषय सांगितलेला आहे. अतिक्रमणचा विषय आहे. अतिक्रमणचे कर्मचारी काम का करीत नाही. माडे साहेब काहीच कार्यवाही करीत नाही. झोपडे काढावीत, साफसफाई करणे. दोन गाडयाचा त्रास होतो. प्रत्येक वेळेस सांगितले आहे. कार्यवाही काहीही करीत नाही. तुम्ही मिटींगला येऊ नका. नगरसेवकांनी फोन केला तर उचलला पाहिजे. अतिक्रमणचे अधिकारी/कर्मचारी यांनी मिटींगला आले पाहिजे.

आरोग्याचे खूप प्रश्न आहेत. किर्तीनगर मध्ये पाणी नाही. गणेशनगरमध्ये पाणी नाही. सगळया गोष्टी आम्ही आरोग्य,पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचा-यांना बोलतो. पाणीपुरवठा विभागाच कर्मचा-यांवर कार्यवाही करा. ७५ टक्के अधिकारी मनापायून काम करतात. काही अधिकारी रात्रंदिवस काम करतात. चार वेळा सांगूनही जे अधिकारी/कर्मचारी काम करत नाही त्यांचेवर कार्यवाही करा.

**मा.राजू बनसोडे -** नांव देणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेली आहे. त्यावर कार्यवाही का होत नाही. आठ महिने झाले त्या विषयाला. राऊत मॅडमला आयुक्त साहेबांनी सुचना दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**मा.प्रविण अष्टीकर सहा.आयुक्त** –याबाबत मी माहिती घेतो व त्याप्रमाणे काय कार्यवाही करता येईल ते बघतो.

**मा.सभापती** – मागील मिटींगमध्ये कुत्र्यांचा आणि डुकराचा विषय झाला होता त्याबाबत काय कार्यवाही केली आहे.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत** – पवनेच्या बाजूला सगळी कुत्रीआहेत. महापालि केत गावे समावि ष्ट झाली आहेत. परंतू काहीही उपयोग नाही.म.न.पा.चे काही अधिकारी यांना ठेवायचे नाही. वीटभट्टी ठेवायची आहे त्यांना नियमाप्रमाणे काही करीत नाही.

**पशुवैद्यकिय विभाग** – कुत्री पकडणा-या माणसाशी संपर्क केला आहे. पुढच्या आठवडयात त्यांना कुत्री पकडण्यासाठी बोलावणार आहे. बाहेरुन कुत्री पककणारे लोक येणार आहेत. तेच ते काम करणार आहेत.

**मा.राजू बनसोडे** – कच-याच्या गाडयावर कर्मचारी काम करतात. किती घाण वास येतो. त्यांचेसाठी मास्क, हॅण्डग्लोज, रेनकोट व बूट देतो का?

**मा.प्रविण अष्टीकर सहा.आयुक्त** – डॉ.अनिल रॉय, आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांना पुढच्या मिटींगला बोलावणार आहे. त्यांचेकडून ही सर्व उत्तरे अपेक्षीत आहे.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. ६ — विषय क्र.- १
दिनांक – ०१/०८/२०१९ — विभाग -
सुचक – मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे. — अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

संदर्भ – प्रभार क्र. ३१ काटेपुरम चौक येथील अडथळा काढणेबाबत. मा.सभापती यांचकडील दिनांक १०८/२०१९ चा पत्र

प्रभार क्र. ३१ काटेपुरम चौक येथील अडथळा काढणेबाबत.काटेपुरम चौक चारी बाजुने रस्त्याचे काम चालूअसून चौकात असणारे सुशोभिकरणाचे म्युनरलमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतुकीस कोंडी होऊन त्या म्युनरला वाहने धडकत आहेत. तेंव्हा सदर म्युनरल काढण्याचा ठराव मंजूर करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ७ — विषय क्र.- २
दिनांक – ०१/०८/२०१९ — विभाग -
सुचक – मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे. — अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

**सदंर्भ** – प्रभाग क्र. ३२ सांगवी भागातील अस्वच्छता असणा-या परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत

मा.सभापती यांचकडील दिनांक १०८/२०१९ चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३२ सांगवी भागातील अनेक सोसायटया जुन्या असून त्यांच्या सभोवताली असणा-या परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य होत असते वत्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो तरी अस्वच्छता असणा-या परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

जा.क्र.हक्षेका/कावि/ ८२/२०१९
दिनांक – २ /०८/२०१९

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी – ३४.

प्रत – सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.